# मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय

## सायबर गुन्हे शाखा

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट :-३१-२२ दिनांक – ०२/०२/२०२२

# मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून नागरीकांना आवाहन

(मोबाईल गेमच्या बाबतीत सतर्क राहण्याबाबत ...)

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीत राहणारे तक्रारदार यांचे एसबीआय व पंजाब नॅशनल बँक खात्यातून त्यांचे संमतीशिवाय ०४,१०,२६९/- रुपये कोणतेही आर्थिक व्यवहार न करता फसवणूक झाल्याबाबतचा तक्रारी अर्ज सायबर गुन्हे शाखा येथे चौकशीकामी दिनांक ०५/०१/२०२२ रोजी (आवक अर्ज क्र. ८(ब) अन्वये) प्राप्त झाला होता.

सदर रक्कम ही मोठी असल्याने रक्कम कपात होताना तक्रारदार यांना बँकेकडुन कोणताही मॅसेज प्राप्त झालेला नव्हता. सदर रक्कम पेटीएमचे माध्यमातुन कपात झाली होती. त्यामुळे पेटीएम सोबत सविस्तर पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम कोणत्या खात्यात गेली आहे याची माहिती घेण्यात आली.

पेटीएम कडुन प्राप्त झालेल्या उत्तरात सदर रक्कम कोडा पेमेंटच्या माध्यमातुन ऑनलाईन गेमकरीता वापरण्यात आली होती. त्यावर अर्जदार यांना त्यांचे मोबाईलमध्ये ऑनलाईन गेम वगैरे डाऊनलोड केले असल्याबाबत विचारणा केली असता त्यांनी असे कोणतेही ॲप/गेम डाऊनलोड केले नसल्याचे सांगितले. त्यावर अधिक तपासाकरीता पोनि/गुंजकर तसेच पोउनि/शेनोलकर यांनी तक्रारदार व त्यांचे घरामधील मोबाईल वापरणा-या सदस्यांना मोबाईलसह सायबर गुन्हे शाखा येथे बोलाविले. त्यावर तक्रारदार हे त्यांचा मुलगा नामे ००००, वय १४ वर्षे याचेसह दिनांक २८/०१/२०२२ रोजी सायबर गुन्हे शाखा येथे हजर झाले.

तक्रारदार यांचे १४ वर्षीय मुलाचे मोबाईलचे विश्लेषण केले असता त्यामध्ये वेगवेगळे मोबाईल गेम/ॲप्स खरेदी केल्याचे दिसून आले, तसेच सदरचे मोबाईल गेम/ॲप्स खरेदी करण्याकरीता तक्रारदार यांचे १४ वर्षीय मुलाने वडीलांचे एसबीआय व पंजाब नॅशनल बँक याची माहिती वापरल्याचे चौकशीअंती निष्पन्न झालेले आहे. त्यामुळे तक्रारदार यांचे ०४,१०,२६९/- रुपये बँकेमधून वर्ग झालेले होते. अश्या प्रकारे तक्रारदार यांच्या रक्कमेची कोणतीही फसवणूक झालेली नसल्याचे चौकशीअंती निष्पन्न झालेले आहे.

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना सायबर सेल कडून आवाहन करण्यात येते की, आपल्या घरातील मुलांना तसेच नातेवाईकांना मोबाईल वापरण्यास दिला असल्यास मोबाईलमधील बँके संदर्भातील गोपनीय माहिती काढून टाकावी. अन्यथा त्याचा इतर ठिकाणी वापर होवून आर्थिक व्यवहार होण्याची शक्यता आहे. तसेच मुलांना ऑनलाईन अभ्यासाच्या अनुषंगाने ॲन्ड्रॉईड मोबाईल देण्यात येतो. तेव्हा मुले त्यातील कोणत्या गोष्टीचा वापर करतात याचेदेखील पालकांनी अवलोकन करावे. आपले बँक खात्याची वेळोवेळी तपासणी करून त्यामधील प्रत्येक व्यवहार हा कशासाठी केलेला आहे याबाबत वेळीच खात्री करावी.

सदरची कामगिरी मा.श्री.डॉ.महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री.अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री.सुजिकुमार गुंजकर, पोनि/सायबर क्राईम सेल, श्री.प्रसाद शेनोलकर, पोउनि/सायबर क्राईम सेल, मपोशि/सुवर्णा माळी, सायबर क्राईम सेल, मपोशि/ माधुरी धिंडे, सायबर क्राईम सेल सायबर क्राईम सेल यांनी केली असुन अश्याप्रकारच्या डिजिटल वापरातुन होणा-या नुकसानीबाबत नागरीकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

---००---